MO.9860898564

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

संपादक - दिपक थोरात

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०२ | अंक -१५६ | गुरूवार दि.२० फेब्रुवारी २०२५ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रु | । पाने ४

Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-02 | Issue -156 | THURSDAY DT.20 FEBRUARY 2025 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

## सरकारच्या अनुदानातून लाटलेल्या घरातच माणिकराव कोकाटेंची दूध डेअरी, गिरीश महाजनांच्या हस्ते उद्घाटन, अडचणी वाढण्याची शक्यता

कृषीमंत्री माणिकराव कोकाटे आणि त्यांचे भाऊ सुनील कोकाटे यांना नाशिक जिल्हा न्यायालयाने २ वर्षांची शिक्षा ठोठावली आहे. १९९५ ते १९९७ च्या काळात सरकारच्या १० टक्के कोट्यातून कमी उत्पन्न दाखवून घर घेतल्याचा आरोप माणिकराव कोकाटे यांच्यावर सुनावण्यात आला होता. तत्कालीन अप्पर जिल्हाधिकाऱ्यांनी चौकशी करून सरकारवाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला होता. गेल्या अनेक वर्षांपासून नाशिक जिल्हा न्यायालयात याबाबत सुनावणी सुरु होती. आज गुरुवारी (दि. २०) न्यायालयाने माणिकराव कोकाटे यांनी शिक्षा ठोठावली आहे. यानंतर सरकारच्या अनुदानातून घेतलेल्या घरातच माणिकराव कोकाटे यांनी व्यवसाय थाटल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.

१९९५ ते १९९७ च्या सालात कमी उत्पन्न दाखवून सध्याचे कृषीमंत्री माणिकराव कोकाटे आणि त्यांचे बंधू सुनील कोकाटे यांनी सरकारच्या अनुदानातून घर घेतले होते. नाशिकच्या कॅनडा कॉर्नरच्या परिसरामध्ये निर्माण स्कूल व्ह्यू या ठिकाणी त्यांचे घर आहे. याच घरात माणिकराव कोकाटे यांनी व्यवसाय देखील सुरू केल्याचं दिसून येत आहे.

# धनंजय मुंडे यांना 'बेल्स पाल्सी' आजार

## सलग २ मिनिटेही बोलता येत नसल्याची स्वतःच दिली माहिती; रिलायन्स हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू

मुंबई / वृत्तसंस्था

बीडच्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याकांडामुळे अडचणीत सापडलेले राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे यांना बेल्स पाल्सी नामक आजार झाला आहे. त्यांनी स्वतःच एका पोस्टद्वारे ही माहिती दिली आहे. या आजारामुळे मला साधे २ मिनिटेही व्यवस्थित बोलता येत नाही. त्यामुळे मला कॅबिनेट व पक्षाच्या जनता दरबाराला उपस्थित राहता येत नसल्याचे त्यांनी सांगितले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आपल्या पक्षाच्या सर्वच मंत्र्यांना व आमदारांना आपापल्या मतदारसंघातील जनतेच्या समस्या सोडवण्यासाठी जनता दरबार घेण्याचे आदेश दिलेत. पण मंत्री धनंजय मुंडे यांनी मागील ६ आठवड्यांपासून एकदाही हा जनता दरबार घेतला नाही. त्यामुळे त्यांनी अजित पवारांच्या आदेशाला केराची टोपली दाखवल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे. या पार्श्वभूमीवर मंत्री धनंजय मुंडे यांनी आपल्याला बेल्स पाल्सी नामक आजार झाल्याची माहिती दिली आहे.डोळ्याच्या ऑपरेशननंतर झाले निदान

धनंजय मुंडे यांनी आपल्या एका पोस्टमध्ये सांगितले की, माझ्या दोन्ही डोळ्यांवर पंधरा दिवसांपूर्वी शस्त्रक्रिया करण्यात आली. पद्मश्री डॉ. टी. पी. लहाने यांच्या मार्गदर्शनाखाली या शस्त्रक्रिया पार पडल्या. साधारण दहा दिवस त्यांनी डोळ्यांची काळजी विशेषतः तीव्र प्रकाश, धूळ आणि उन्हा पासून काळजी घेण्याचा सल्ला दिला होता.

त्याच दरम्यान मला आजाराचे निदान झाले. त्याच्यावरील उपचाराचे निदान सध्या रिलायन्स हॉस्पिटल मधील प्रसिद्ध डॉ.



अरुण शहा यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. या आजारामुळे सध्या मला सलग दोन मिनिटही व्यवस्थित बोलता येत नाही. त्यामुळे सध्या एक-दोन कॅबिनेट आणि पक्षाच्या जनता दरबार कार्यक्रमाला मला उपस्थित राहता आले नाही.

याबाबत मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब तसेच आमच्या पक्षाचे नेते उपमुख्यमंत्री अजित पवार यांना कल्पना दिलेली आहे. लवकरच या आजारावर मात करून मी पुन्हा जनसेवेच्या कामात रुजु होईल, असे ते म्हणालेत.









बीड (प्रतिनिधी)

दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती, बीड शहर यांच्या माध्यमातून, आ.संदीप क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली डीजेमुक्त आणि वर्गणीमुक्त सांस्कृतिक शिवजयंती सोहळा पार पडला. या कार्यक्रमाच्या माध्यमातून बीडकरांना विविध कला-क्रीडा सादरीकरणाच्या माध्यमातून अनोखी मेजवानी मिळाली.सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती, बीड शहक्ष यांच्या आयोजनातून बीड शहरातील छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगणावर बुधवारी (दि.१९) रोजी शिवजन्मोत्सव सोहळ्याचा कार्यक्रम पार पडला. यावेळी लाखो शिवप्रेमींनी या कार्यक्रमाचा मनमुक्त आनंद घेतला. आ.संदीप क्षीरसागरांनीही ढोल-ताशांच्या आणि शिवगीतांवर ठेका धरला होता. हे पाहून तरुणाई भारावली होती. या कार्यक्रमास बीड शहरासह ग्रामीण भागातील सर्व क्षेत्रातील मान्यवर, लाखो शिवप्रेमी नागरिक उपस्थित होते.संदीपभैय्यांना मानावेच लागेल- मनोज जरांगे पाटीलअशा प्रकारची शिवजयंती मी पहिल्यांदाच पाहतोय. अशा प्रकारचे कौतुकास्पद नियोजन आणि आयोजन आ.संदीप भैय्या क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली झालेले आहे. महिला भगिनींनाही शिवजयंती उत्सवात सहभागी होता येईल याची काळजी शिवजयंती उत्सव समितीकडून घेतली जाते. ही विशेष बाब आहे. यासाठी तर संदीपभैय्यांना मानावेच लागते. अशा शब्दांत संघर्षयोध्दा मनोज जरांगे पाटील यांनी आ.संदीप क्षीरसागर व शिवजयंती उत्सव समितीचे कौतुक केले.

# अपात्र लाडक्या बहिणींची संख्या ९ लाखांवर

## १५०० रुपये बंद होणार, दरवर्षी ई-केवायसी करावी लागणार

**मुंबई : मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतून कमी केलेल्या महिलांची संख्या ९ लाख होणार आहे. यापूर्वी ५ लाख महिलांची नावं कमी करण्यात आली होती. आता नव्याने ४ लाख महिलांची संख्या कमी होणार असल्याची माहिती आहे. त्यामुळे राज्य सरकारच्या ९४५ कोटी रुपयांची बचत होणार असल्याची माहिती आहे. नमो शेतकरी योजनेचा लाभ आणि लाडकी बहीण योजनेचा लाभ घेणा-या ५ लाख महिला आहेत. या महिलांना लाडकी बहिण योजनेतील फक्त ५०० रुपये मिळणार तर नमो शेतकरी योजनेतून १००० रुपये मिळणार आहेत.**

**दिव्यांग विभागातून लाभ मिळणाऱ्या महिलांना लाडकी बहीण योजनेतून त्यांना वगळलं जाणार आहे.वाहनं असलेल्या अडीच लाख महिला आहेत त्यांना ही यातून वगळण्यात आलं आहे. सोबतच निकषात न बसणा-या अनेक महिला आहेत त्यांनी ही पैसे परत करायला सुरुवात केली आहे.**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे नवे निकष

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी आता सरकारकडून नवे निकष लागू केले जातील. पात्र महिलांनाच योजनेचा लाभ मिळवा यासाठी सरकारकडून आता कठोर पाऊले उचलली जाणार आहेत.

लाडकी बहीण योजनेतील लाभार्थी महिलांना दरवर्षी जून महिन्यात बँकेत ई-केवायसी करुन हयातीचा दाखलाही जोडावा लागणार आहे. दरवर्षी १ जून ते १ जुलै दरम्यान ई-केवायसी करावी लागणार आहे. ज्या महिला विविध सरकारी योजनांचा लाभ घेतात आणि ज्यांचे उत्पन्न अडीच लाखांहून अधिक आहे, त्यांचा या योजनेतून अपात्र केलं जाणार आहे.

लाभार्थी महिलांचे उत्पन्न अडीच लाखांहून अधिक आहे की नाही, हे तपासण्यासाठी राज्य सरकारकडून प्राप्तीकर विभागाची मदत घेतली जाणार आहे. नव्याने पात्र झालेले तसेच नव्याने आधार जोडणी केलेल्या लाभार्थ्यांना आता आधीच्या महिन्यांचा म्हणजेच जुलैपासून लाभ न देता अर्ज मंजूर झाल्याच्या पुढील महिन्यापासून लाभ दिला जाणार आहे.







## सुरेश धस यांचा आणखी एक गौप्यस्फोट

# पिकविमा घोटाळ्यातील रेट कार्डच दाखवले वाचून, धनंजय मुंडेंवर गंभीर आरोप

बीड - भाजप आमदार सुरेश धस यांनी आष्टी येथे पत्रकार परिषद घेत पिकविमा घोटाळ्यावर भाष्य केले आहे. यावेळी त्यांनी मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर पुन्हा घोटाळ्याचे आरोप केले आहेत. धनंजय मुंडे यांनी मूळ बाबी बदलून नॅनो युरिया, नॅनो डीएपीबाबत चर्चा केली असल्याचा आरोप सुरेश धस यांनी केला आहे. याबाबतचा प्रस्ताव महाविकास आघाडीचे सरकार असताना मुंडे यांनी पाठवले असल्याचेही सुरेश धस यांनी सांगितले आहे.

सुरेश धस म्हणाले, ६ मार्च २०२३ रोजी धनंजय मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक बोलावण्यात आली होती. त्यात मूळ बाबी बदलून नॅनो युरिया, नॅनो डीएपीबाबत चर्चा केली. १२ मार्च रोजी तातडीने नॅनो युरिया, नॅनो डीएपीबाबत जीआर काढण्यात आला. १२ मार्चला प्रस्ताव पाठवला आणि लगेच १२ मार्च २०२३ रोजी जीआर देखील मिळाला.

राज्य पुरस्कृत कापूस सोयाबीन आणि इतर धन्य उत्पादकता वाढ ही महाराष्ट्र शासनाने अर्थसंकल्पीय अधिवेशन दिनांक ११ मार्च २०२२ या दिवशी हे महाविकास आघाडीचे सरकार असताना यावेळी उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री महाराष्ट्र राज्य यांनी या योजनेची घोषणा केली. या योजनेसाठी २०२२-२३, २०२३-२४ आणि २०२४-२५ या तीन वर्षांसाठी एक हजार कोटी रुपयांची तरतूद करण्याची घोषणा केली. या योजनेत सोयाबीन व इतर गळीत पीक धान्य पद्धतीत चालना देऊन शेतकऱ्यांच्या उत्पादकतेत वाढ करणे, उत्पादकता वाढवणे, साठवणूक सुविधा, नवीन तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवणे, संरक्षण देण्यासाठी तारण योजना, हे या योजनेचे मुख्य उद्दिष्ट होते.

उद्दिष्टांच्या बाबी कोणत्या ठरवल्या तर पिकांची उत्पादकता वाढ व शेतकऱ्यांची क्षमता बांधणे, त्यात प्रात्यक्षिके, शेतकरी शाळा इत्यादि. यात कापूस २५६ कोटी आणि सोयाबीन २९४ कोटी असे ५५० कोटी रुपये. बियाणे बळकटीकरण हे फक्त कृषी विद्यापीठाला देण्यासाठी कापसाला १५ कोटी, सोयबीनला ३५ कोटी म्हणजे असे ५० कोटी असे देण्यात आले.

# बलभीम नगर बुद्धविहारात छत्रपती शिवाजी महाराज याची जयंती जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांच्या उपस्थित संपन्न

बीड (प्रतिनिधी)

बलभीम नगर बुद्ध विहार, बलभीम नगर, शिवाजीनगर, पालवण रोड बीड येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त प्रमुख पाहुणे म्हणून शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख सचिन मुळक व स्वप्निल भैय्या गलधर तसेच संदीप उबाळे यांची प्रमुख उपस्थितीत लाभली होती सर्वप्रथम तथागत गौतम बुद्ध छत्रपती शिवाजी महाराज व महात्मा फुले यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले त्यानंतर प्रमुख पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले व त्यानंतर जिल्हाप्रमुख सचिन मुळुक यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या इतिहास सांगताना म्हणाले छत्रपती शिवाजी महाराज यांनी १८ पगड जातीचे लोक एकत्र करून स्वराज्य निर्माण केले आहे सर्व जाती धर्माच्या लोकांना एकत्र करून जातीच्या पलीकडे जाऊन त्यांना मावळा म्हणून ओळखले जाते



महाराज आपल्या प्रत्येक मावळ्यावर खूप प्रेम करत असत ते प्रत्येक मावळ्याला आपल्या कुटुंबातील एक भाग समजत असत त्यांच्या सुखदुःखात सहभागी होत असत छत्रपती शिवरायांनी मावळ्याच्या सहकार्याने अनेक गड किल्ले काबीज करून अनेक मुघल राजांचा पराभव केला आजच्या पिढीला महाराजा कडून खूप काही शिकण्यासारखं आहे आपण शिकले पाहिजे शौर्य आणि धैर्य,शक्तीपेक्षा युक्ती श्रेष्ठ, गनिमी कावा,आई बहिणींचा आदर केला पाहिजे, शीलाचे पालन केले पाहिजे, समता व न्याय अशा अनेक गोष्टी महाराजाकडून शिकल्या पाहिजे या गोष्टी महाराजांनी आपल्याला शिकवलेल्या आहेत त्या आजही आपण आचरणात आणल्या पाहिजेत, अशा या महान रयतेच्या राजाला जयंतीनिमित्त मानाचा मुजरा असे मत जिल्हाप्रमुख सचिन मुळक यांनी व्यक्त केली त्यावेळी कार्यक्रमाचे आयोजन ड तेजस वडमारे अंजली वडमारे सिद्धार्थ वडमारे गौतम खेमाडे अजय जाधव यांनी केले होते या कार्यक्रमास अंकुश जाधव,राहुल नवले, विराज साळवे,आशा धनवे,वर्षा खेमाडे,शिवकन्या खेमाडे, रमाबाई सोनवणे, मीना अंकुटे, मालन अंकुटे,उर्मिला वडमारे, क्रांती धनवे, प्रीती जाधव,राज जाधव,जयश्री वडमारे, विशाल वडमारे, आर्यन साळवे,नागेश साळवे, सिद्धार्थ साळवे व परिसरातील बुद्ध, शिव, फुले शाहू आंबेडकर यांच्या विचारचे बांधव उपस्थित होते.



छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त अश्विनी दातांचा दवाखाना वडवणी आयोजित दंत रोग निदान व उपचार शिबिर १०० रुग्णांवर यशस्वी उपचार करण्यात आले तरी सर्व डॉक्टरांचे टीम वी.रींवहीं वीं.ींाशवह वी .िरपींोह यांचे खूप खूप आभार



दि १९/२/२०२५ शिवजयंती निमित्त अंग७।११३ील. १५ बार्शीनाका बीउ येथे अंगणवाडी सेविका अलका मॅडमन पवार मॅडम, व माजा पालक सौ कविता पवार, सौ मनिषा बंगुरे, खेसाळवे जाई, सौगायगी दुधाळ, यो पूजा गायकवाड, मौ शांताबाई गायकवाउ, सौ राऊत लाई, सोनिकीला दुधाळ, सौ कोमल भराटे, सौशिला चौगुले, अक्सा रेहान खान यांनी सर्वांनी, आपल्या मुखांची वेशभुषार शिवाजी महाराज, राजमाता जिजाऊ) रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. सार्वांनी कार्यक्रमाल उत्साहाने भाग घेतला अंगणवाडी सेवीका वमदतनीस् तर्फे माला पालकांचे आभार मानण्यात आले.

# प्रशासनाला कारंजा टॉवरची दैनावस्था दुर करावीच लागेल!

## आता जनतेतही निर्माण झाली जागरूकता - एस.एम.युसूफ़, रमेश गंगाधरे

बीड (प्रतिनिधी)

कारंजा टॉवर साठी आता जनताही सरसावली असून मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ आणि ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते रमेशराव गंगाधरे यांनी दिलेल्या निवेदनानंतर कारंजा टॉवर जवळ सिमेंटचे चार बाकडे ठेवण्यात आले. हे पाहून कारंजा, अजीजपुरा आणि खंदक भागातील अनेक नागरिकांनी सुद्धा जागरूकता दाखवत जिल्हाधिकारी यांना निवेदन दिल्याचे प्रसिद्धी माध्यमातून समोर आले आहे. यावरून ऐतिहासिक ठेवा असलेल्या कारंजा टॉवरला गतवैभव पुन्हा प्राप्त होणार असे कारंजा टॉवर च्या प्रश्नांविषयी लक्ष वेधणारे मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ आणि ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते रमेशराव गंगाधरे यांनी म्हटले आहे.

याविषयी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे की, १४ फेब्रुवारी २०२५ रोजी कारंजा टॉवर विषयी जिल्हाधिकारी, मुख्याधिकारी, तहसीलदार आणि जिल्हा पोलीस अधीक्षक यांना निवेदन दिल्यानंतर याविषयी १५ ते १९ फेब्रुवारी २०२५ पर्यंत स्थानिक तसेच विभागीय वृत्तपत्रातून बातम्या प्रसिद्ध झाल्या. याचाच परिणाम म्हणून कारंजा टॉवर जवळ सिमेंटचे चार बाकडे ठेवण्यात आले आहे. हे पाहून कारंजा परिसरासह अजीजपुरा आणि खंदक येथील नागरिकांचाही हुरूप वाढल्याने त्यांनी एकत्रित येऊन कारंजा टॉवर विषयी जिल्हा प्रशासनासह बीड नगर परिषदेत निवेदन दिल्याचे प्रसिद्धी माध्यमातून समोर आले आहे. यामुळे कारंजा टॉवर विषयी आता सर्वसामान्य जनतेतही जागरूकता निर्माण झाल्याचे दिसून येत आहे. यामुळे कारंजा टॉवरचा लढा आता खऱ्या अर्थाने जनतेने हातात घेतला असल्याचे दिसून येत आहे. जनरेटा वाढल्याने आता बीड नगरपालिकेसह जिल्हा प्रशासनालाही विशेष लक्ष देऊन कारंजा टॉवरची दैनावस्था दूर करावीच लागेल. जोपर्यंत कारंजा टॉवरचे नूतनीकरण परिपूर्ण होत नाही तोपर्यंत स्वस्थ बसणार नाही व लढा सुरूच ठेवणार असे मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ आणि ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते रमेशराव गंगाधरे यांनी म्हटले आहे.




# पहिली अखिल भारतीय बौद्ध धम्म परिषद जवळा फकीर येथे मोठ्या हर्ष उल्हासात संपन्न

धारूर (प्रतिनिधी)

धारूर तालुक्यातील जवळा फकीर येथे दिनांक १८ फेब्रुवारी २०२५ रोजी अखिल भारतीय बौद्ध धम्म परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या धम्म परिषदेस मोठ्या संख्येने बौद्ध उपासक उपासिका उपस्थित असल्याचे पहावयास मिळाले. धारूर तालुक्यातील फकीर जवळा येथे संपन्न झालेल्या पहिल्या धम्म परिषदेस प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ भदंत उपगुप्त महाथेरो पूर्णा हे उपस्थित होते. पहिल्या सत्रामध्ये पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण त्रिशरण पंचशील ग्रहण करून करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण धम्म परिषदेचे मुख्य आयोजक भदंत पयातीस महा थेरो यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पंचक्रोशीतील बौद्ध उपासक उपासिका उपस्थित होते. पहिल्या धम्म परिषदेचे आयोजन जवळा फकीर येथील मृगदयावान महाविहार बौद्ध धम्म संस्कार शिक्षण संस्था जवळा फकीर तालुका धारूर जिल्हा बीड येथे करण्यात आले होते. या संस्थेच्या उभारणीसाठी परिसरातील गवळी नामक शेतकऱ्यांनी स्वतःची एक एकर जमीन ही दान म्हणून दिलेली आहे. त्याच जागेवर या धम्म परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या ठिकाणी प्रत्येक पौर्णिमेला कार्यक्रम घेण्यात येतो, या ठिकाणी धम्म हॉलची उभारणी देखील सध्या सुरू आहे. धम्म परिषदेचे प्रास्ताविक



आयोजक भदंत पय्यातीस महाथेरो यांनी केले. तर भदंत उपगुप्त महाथेरो पूर्ण, भदंत इंदूवस महाथेरो, भदंत पयारत्न थेरो, भदंत भैय्या बोधि थेरो, भदंत पयानंद थेरो भिकू संघरत्न हे होते, तर उपस्थितीमध्ये प्रा. प्रदीप रोडे आले होते. तर धम्मदेशना कार्यक्रम भोजनदानाच्या नंतर संपन्न झाली. त्यापूर्वी उपस्थित भिकू संघाचे स्वागत व सत्कार करण्यात आला. यावेळी भदंत पयानंद यांनी धम्मदेशना देते प्रसंगी श्रीलंकेमधील भंते यांनी एका पादरीस स्वतःची किडनी दान करून दान परमिता ही कशा पद्धतीने असते हे द्रास सांगितले, ज्यामध्ये सदरील भंते यांना दान करायचे असताना एका पादरीस किडनीची आवश्यकता होती तर भंतेंनी त्यांना किडनी दान दिली यावेळी पादरींचे बंधू हे डॉक्टर असल्या कारणाने त्यांना लागलीच कळाले की त्यांच्या भावाला पण त्यांनी किडनी दान दिली आहे, तर भत्तेना डॉक्टर बंधने चार लाख रुपयांची भेट देण्याचे ठरवले परंतु भंतेंनी जर चार लाख रुपये घेतले तर दानपरमिता पूर्ण होणार नाही म्हणून ती भेट नाकारली या पद्धतीनेच दानपरिमितेचे महत्त्व भदंत पयानंद यांनी उपस्थित उपासक उपासिकांना सांगितले तसेच मृगदयावान महाविहारास परिसरातील नागरिकांनी धम्मदान देऊन विहारात आपले मोलाचे असे योगदान द्यावे असेही सांगितले. धम्म परिषद यशस्वी करण्यासाठी माजी शिक्षक रोहीदास मोतिराम गवळी अनिल रोहीदास गवळी,जानकीराम मोतिराम गवळी, लताबाई जानकीराम गवळी,पो.पा.लिबाजी चागुजी गवळी, पवित्राबाई लिंबाजी गवळी,नरहरी चागुजी गवळी, गंगाबाई नरहरी गवळी,साधु कांबळे,साखरबाई साधु कांबळे,माजी शिक्षक दिलीप पंढरी कांबळे धाराशिव आदींचे सहकार्य लाभले. न्यूज २३ मराठीचे संचालक गणेश शिंदे यांनी संपूर्ण धम्म संपूर्ण फेसबुक वरून लाईव्ह प्रसारित केली. जमीन दानदाते प्रभाकर सोनबा गवळी व शांतिप्रिया प्रभाकर गवळी यांनी १ एकर जमीनदान दिली.तर अन्नदान दान - रुक्मिणी पंढरीनाथ हिरवे व पंढरीनाथ सखाराम हिरवे यांच्या कुटुंबीयांकडून पहिल्या अखिल भारतीय बौद्ध धम्मपरिषदेसाठी आलेल्या सर्व उपासक उपासिकांसाठी अन्नदान करण्यात आले व भिकू संघाला भोजनदान लताबाई भाऊराव गवळी यांनी दिले. चाटगावचे सरपंच यांनी धम्म परिषदेमध्ये पिण्याच्या पाण्याच्या जार व्यवस्था केली. धम्मपरिषदेसाठी लावण्यात आलेल्या सर्व होर्डिंग बॅनर चे दान डॉ.संजय नागलगावकर दिले.उपस्थित अनेकांनी यावेळी रोख स्वरूपात धम्मदान दिले आहे.



# महिलांनी रक्तदान करून केली शिवजयंती साजरी -अशोक काळे

बीड (प्रतिनिधी)

अंबाजोगाई शहरालगत असलेल्या जोगाई वाडी येथील वरात पार्क येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंती मोठ्या उत्साहात व विविध उपक्रम करून साजरी करण्यात आली यामध्ये प्रामुख्याने रक्तदान शिबिर त्यामध्ये २७ जणांनी रक्तदान केले तसेच आरोग्य शिबिर तपासणी त्याचा लाभ जवळपास १५० जणांनी घेतला तसेच अल्पोपाराचा व मतिमंद विद्यालय येथे खाऊ वाटप करून आगळ्यावेगळ्या पद्धतीने छत्रपती शिवाजी महाराज जयंती ही साजरी करण्यात आली कमिटीचे हे पहिले वर्ष असल्यामुळे काहीतरी आगळा वेगळा उपक्रम म्हणून कमिटीचे अध्यक्ष तथा लोक जनशक्ती पार्टीचे बीड जिल्हा अध्यक्ष अशोक भैया काळे यांनी छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त अवयवदानाचा मोठा निर्णय घेऊन शासकीय रुग्णालयाला अवयव दाना करण्याचा संकल्प केला यात शासकीय रुग्णालयाकडून त्यांना ऑर्गन डोनर चे सर्टिफिकेट देऊन सन्मानित केले यावेळी शेळी मेंढी महामंडळ महाराष्ट्र चे माजी अध्यक्ष राज्यमंत्री दर्जा लोक जनशक्ती पार्टीचे मराठवाडा प्रदेशाध्यक्ष राजेश वाहूळे भीमशक्तीचे बीड जिल्हा कार्याध्यक्ष भीमराव सरवादे साहेब आगळे सर स्वामी सर चव्हाण सर अंबड सर तेलंग सर या सर्व मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून शिवजयंतीची सुरुवात करण्यात आली यावेळी समिती करण तेलंग सुजित मुसळे वैभव सोनवणे रोहन पोळ पद्माकर अदनाक प्रदीप जाधव अभिनित करडे व लोक जनशक्ती पार्टीचे जिल्हाध्यक्ष अशोक काळे त्यांनी पुढाकार घेऊन कार्यक्रम यशस्वी केला



छत्रपती शिवाजी महाराजांचा जयंती उत्सव मोठ्या थाटात कारखेल बुद्रुक येथे करण्यात यावेळी विद्यार्थ्यांनी आपली कला दाखवत प्रेक्षकांचे मन जिंकले यावेळी उपसरपंच किशोर पवार गणेश गव्हाणे स्वप्नील पवार महेश काळे निलेश पवार आबासाहेब कवळे सह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते छायाचित्र सुरेश कांबळे

# आजपासून श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थान महाशिवरात्री महोत्सवास प्रारंभ

## सप्ताह सोहळ्याचा लाभ घ्यावा ; महंत शांतीब्रम्ह तुकाराम भारती महाराज

लिंबागणेश (प्रतिनिधी)

बीड तालुक्यातील बेलगाव येथील श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थान मौजे बेलगाव पो. लिंबागणेश याठिकाणी दि.२० ते २७ फेब्रुवारी दरम्यान महाशिवरात्री महोत्सव संपन्न होत आहे. त्या प्रित्यर्थ अखंड हरिनाम सप्ताह, ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा व अखंड विनावादन सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असून या महोत्सवाचा अखंड पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन मार्गदर्शक श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थान मठाधिपती ह.भ.प. महंत महादेव बाबा भारतीजी व कार्यक्रमाचे आयोजक ह.भ.प.शांतीब्रम्ह तुकाराम महाराज भारती , महोत्सव कमिटीने केले आहे. आज दि.२० गुरुवार रोजी महोत्सवास प्रारंभ झाला असुन सकाळी भगवान बेलेश्वर महादेवास अभिषेक,ध्वजपुजन करत श्री गणपती पुजनास सकल संतांचे वंदन केले.त्यानंतर वीणा,पखवाज,पेटी यांचे पुजण करण्यात आले. समस्त भाविक भक्तांच्या उपस्थितीत वीणा उभारण्यात आला. महोत्सव कमिटीच्या वतीने पंचक्रोशीतील उपस्थित सरपंच, उपसरपंच, गावातील प्रतिनिधी यांचा शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.



ह.भ.प. शिवचरित्र बबन महाराज मंझरीकर हवेली ,दि.२१ शुक्रवार रोजी ह.भ.प. युवा किर्तनकार अक्षय महाराज पिंगळे बीड,दि.२२ शनिवार रोजी ह.भ.प. रामायणाचार्य एकनाथ महाराज गाडे चकलांबा दि.२३ रविवार रोजी ह.भ.प.वारकरी भुषण राम महाराज डोंगर आळंदी,दि.२४ सोमवार रोजी ह.भ.प. रामहरी महाराज वायबसे सावरगाव ( सोने) दि.२५ मंगळवार रोजी ह.भ.प. प्रेममुर्ती धर्मराज ( दादा) महाराज श्रीक्षेत्र सामनगाव गुरूपीठ,दि.२६ बुधवार रोजी ह.भ.प.विनोदाचार्य दिपक महाराज बादाडे माजलगाव यांचे किर्तन होणार असुन दि.२७ गुरुवार रोजी ह.भ.प. लक्ष्मण महाराज मेंगडे , अध्यक्ष बंकटस्वामी संस्थान नेकनुर यांचे काल्याचे कीर्तन होऊन महाप्रसादाने सांगता होणार आहे.

### विविध धार्मिक कार्यक्रम

बेलेश्वर संस्थान बेलगाव येथील महाशिवरात्री महोत्सवात काकडा,भजण, शिवलीलामृत पारायण, गाथा पारायण, भावार्थ रामायण, हरिपाठ,हरिकिर्तन,जागर अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असुन या सप्ताहात लिंबागणेश पंचक्रोशीतील भजणी मंडळ उपस्थित राहणार आहेत.



शासकीय सार्वजनिक शिवजयंती निमित्त सर्व कार्यक्रम शांततेत पार पाडले या कामी विशेष सहकार्य केले शांतता कमिटीचे सदस्य मुसा खान पठाण अशोक कांबळे साजन चौधरी व शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री शितल कुमार बल्लाळ साहेब व नलावडे साहेब आणि शहर पोलीस स्टेशनचे पोलीस कर्मचारी सोबत दिसत आहेत.




छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती देशभरात मोठ्या उत्सहात साजरी होते. त्या अनुषंगाने छत्रपती शिवाजी महाराज यांचा जयंती निम्मित बीड शहरात भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन रौद्रशंभू युवा प्रतिष्ठानच्या वतीने केले होते. रक्तदान हे जात पात पाहुण केले जात नाही रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे. १९ फेब्रुवारी रोजी स.१० ते ४ वाजे पर्यंत मुत्काई लॉन्सच्या पाठीमागे रक्तदान शिबिर आयोजित केले होते. रक्तदान म्हणजे जीवनरक्षक ते आपण व्हा, असे आवाहन रौद्रशंभु युवा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष तथा युवा नेते गणेश भैय्या शिराळे पाटील यांनी केले होते.

# बाळनाथ विद्यालय चाकरवाडी शाळेत दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ संपन्न झाला

बीड (प्रतिनिधी)

बीड तालुक्यातील श्री क्षेत्र चाकरवाडी येथील बाळनाथ विद्यालय चाकरवाडी या शाळेतील १०वीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ संपन्न झाला. यावेळी या कार्यक्रमासाठी डॉ. ज्योतीताई मेटे, प्रा. फाटक सर, महसुल सहाय्यक महेश पवार, पत्रकार अभिजीत पवार, महसुल सहाय्यक आकाश चौधरी, मस्के तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. यावेळी इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले या मधे श्वेता खराडे, स्वरूपा जगताप यांनी मागील सहा वर्षांमधील आठवणीना उजाळा दिला. निरोप समारंभाच्या वेळी सर्व मुले भावूक झाली होती. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. ज्योतीताई मेटे म्हणाल्या की विद्यार्थ्यांना ज्या कार्यक्रमातून प्रोत्साहन भेटते ते कार्यक्रम आयोजित करावेत. दहावी च्या विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धा परीक्षांना सामोरे जावे. विद्यार्थीनी अपयश जरी आले तरी निराश न होता जोमाने अभ्यास करावा, यश आपलेच आहे. तसेच शाळेचा माजी विद्यार्थी महसूल सहायक पदी निवड झालेला महेश पवार यांनी सुद्धा त्यांच्यावर पुढे जात असताना किती संकटाचा सामना करावा लागला हे सांगितले. विद्यार्थ्यांना शुभेच्छा देऊन परीक्षा संबंधी माहिती दिली. त्यात ते म्हणाले दहावी हा एक महत्त्वाचा टप्पा असून कोणत्याही प्रकारचा ताण तणाव विद्यार्थ्यांनी ठेवू नये. सद्गुरूंच्या ध्यानाने परीक्षेची सुरुवात करावी. मनावर कोणत्याही प्रकारचे दडपण न ठेवता अभ्यास करा. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नववी च्या विद्यार्थ्यांनी खूप मेहनत घेतली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तृप्ती कदम आणि कोमल खिंडकर यांनी केले आणि आभार श्रुती कदम यांनी मानले.



# छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती डीजे वाजून नाही .तर पुस्तक वाटप करुन साजरी केली शिवजयंती

## केतुरा गावचे विद्यमान सरपंच परमेश्वर नाना तळेकर व डॉ. आकाश तळेकर यांचा सामाजिक उपक्रम

बीड (प्रतिनिधी)

आज बीड शहरातील मराठवाडा अभ्यासिका व केतुरा गावचे विद्यमान सरपंच. परमेश्वर नाना तळेकर व डॉ.आकाश तळेकर यांच्या संयुक्त विद्यमानाने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त एक अनोखा सामाजिक उपक्रम राबवला आहे. डीजे वाजून नाही तर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त महापुरुषांची पुस्तक वाटप करून विद्यार्थ्यांच्या समवेत केली शिवजयंती साजरी. यावेळी जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे प्रस्ताविक युवा पत्रकार अंकुश गवळी यांनी केले, छत्रपती शिवाजी महाराज यांचा जन्म १९ फेब्रुवारी १६३० रोजी महाराष्ट्रातील शिवनेरी येथील एका मराठा कुटुंबात झाला. शिवाजी महाराजांचे वडील शहाजी आणि आई जिजाबाई होते. आई जिजाबाई, स्वभावाने धार्मिक असूनही, तिच्या गुणांनी, स्वभावाने आणि वागण्यात एक धाडसी महिला होत्या. त्यांनी बाळ शिवाला रामायण, महाभारत आणि इतर भारतीय नायकांच्या गौरवशाली कथा सांगून आणि शिक्षण देऊन वाढवले सर्वगुण संपन्न माझ्या राजाने जगाला एक नवी दिशा दिली अखंड भारताचे आराध्य दैवत शिवराय यांची जयंती ही वैचारिक मंथन करणारी व्हावी यासाठी हा उपक्रम राबविला अस केतुरा गावचे सरपंच परमेश्वर तळेकर म्हणाले, या उपक्रमाची जिल्हाभरात खूप मोठ्या प्रमाणात चर्चा होत आहे, यावेळी मराठवाडा अभ्यासिकेचे विद्यार्थी व युवक खूप मोठ्या प्रमाणात उपस्थित होते



# शुक्रवारी बीडमध्ये मोफत मुळव्याध तपासणी

## महिलांसाठी तज्ञ महिला डॉक्टरांची उपस्थिती

साहेबराव खेत्रे यांच्या पुण्यस्मरण निमित बीडच्या सुश्रुत मुळव्याध हॉस्पिटलचा उपक्रम

बीड । प्रतिनिधी

मुळव्याधाच्या रुग्णांसाठी मुळव्याध तज्ज्ञ डॉ. अमोल खेत्रे यांनी बीडमध्ये मोफत मुळव्याध तपासणी शिबीराचे आयोजन कै. साहेबराव दगडु खेत्रे यांच्या प्रथम पुण्यस्मरण निमित केले आहे. या शिबीरात तज्ज्ञ डॉक्टरांची टिम पूर्णपणे मोफत तपासणी करणार आहे. विशेष म्हणजे महिलांच्या तपासणीसाठी तज्ज्ञ महिला डॉक्टरांची उपस्थिती राहणार आहे. हे शिबीर बीड शहरातील जालना रोड येथील सुश्रुत मुळव्याध हॉस्पिटल येथे शुक्रवार दि. २१ फेब्रुवारी २०२५ रोजी होणार आहे. शिबीरातील रूग्णांना औषध उपचारातही सुट देण्यात येणार आहे.

मुळव्याध-भगंदर-फिशरचे लक्षणे आढळून आल्यास तत्काळ डॉक्टरांकडून तपासणी करुन घेणे गरजेचे आहे. तपासणी न केल्यामुळे मुळव्याध हा आजार वाढतच जातो. आणि त्याचे दुष्परिनाम भविष्यात रूग्णांना सहन करावे लागतात. सुश्रुत मुळव्याध हॉस्पिटल बीडच्या वतीने मुळव्याध- भगंदर- फिशरची मोफत तपासणी शुक्रवार दि. २१ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ यावेळेत करण्यात आले आहे. बीड शहरातील जालना रोड येथील डी.सी. लोढा कॉम्लेक्स, मंत्री बँकेच्या शेजारी असलेल्या सुश्रुत मुळव्याध हॉस्पिटल येथे हे शिबीर आयोजीत करण्यात आले आहे. मुळव्याध-भगंदर-फिशर याचे लक्षणे मलप्रवृत्तीच्या वेळेस किंवा नंतर रक्त पडणे, शौच्याच्या जागेवर आजुबाजुला गाठ येणे, त्यामधून चिकट स्त्रव व रक्त येणे, शौचाच्या जागी आग होणे, वेदणा होणे, टोचल्यासारखे वाटणे, शौचाच्या वेळेस मांसल गोल आकराचा भाग बाहेर येणे इत्यादी लक्षणे असल्यास त्याची तत्काळ तपासणी करुन त्यावर निदान करता येते. मात्र त्याकडे दुर्लक्ष केल्याने हा आजार बळावतो. त्यासाठी तपाणी करुन घेणे अत्यंत गरजेचे आहे. या हॉस्पिटलमध्ये गुदगत आजारांसाठी क्षारसुत्र, क्षारकर्म, आग्निकर्म सुरक्षित आयुर्वेदिक उपचार पध्दती उपलब्ध आहेत. या शिबीरामध्ये फोनवरही नाव नोंदणी करण्याची



# महाशिवरात्रीनिमित्त राजापुरात अखंड हरिनाम सप्ताह व गंगाआरतीचे आयोजन

तलवाडा (प्रतिनिधी)

गेवराई तालुक्यातील राजापुर येथे महाशिवरात्री निमित्ताने राजेश्वर महादेवाच्या मंदिरात अखंड हरिनाम सप्ताह व गंगाआरतीचे आयोजन करण्यात आले आहे. राजापुर येथे गोदावरी नदिकाठावर राजेश्वर महादेवाचे पुरातन हेमाडपंथी मंदिर आहे.जागृत देवस्थान असलेल्या या मंदिराचा नामोल्लेख अनेक ग्रंथात आलेला असुन महाशिवरात्री निमित्ताने गांवकर्यांकडुन विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असुन अखंड हरिनाम सप्ताहात शिवरात्रीदिवशी गोदावरी नदिवरील घाटावर गंगा आरतीचे आयोजन करण्यात आलेले आहे.

दि.२० गुरुवारपासुन अखंड हरिनाम सप्ताहाचा प्रारंभ होत असुन दि.२७ फेब्रुवारी रोजी काल्याच्या कार्तनाने सांगता होणार आहे.या सप्ताहात भागवत कथेचेही आजोजन असुन माजलगांवचे मार्तंडशात्री यांच्या वाणीतुन कथा ऐकविली जाणार आहे.यासह कार्यक्रमात गाथाभजन,हरिपाठ,शिवलिलामृत पारायण यासह किर्तनेही होणार असुन दि.२० गुरुवार रोजी ह.भ.प.सिध्देश्वर महाराज बेडके,२१ रोजी ह.भ.प.माणिक महाराज मुळे,दि.२२ रोजी नंदकिशोर महाराज जाधव,दि.२३ रोजी ह.भ.प.योगेश महाराज गायके, दि.२४ रोजी ह.भ.प.नारायण महाराज गरड,दि.२५ रोजी राम महाराज मूळे,दि.२६ रोजी दूपारी ह.भ.प.शिवाजी महाराज गिरी व रात्री ह.भ.प.भगवंत महाराज पुरी यांचे तर दि.२७ ला सांगतेला ह.भ.प.शंकर महाराज चिंचकर यांचे काल्याचे किर्तन होऊन महाप्रसाद होणार आहे.सप्ताहात काल्याच्या महाप्रसादाचे यजमान अच्युत पुरी व चंद्रकांत पुरी हे असणार आहेत.



काशी व बनारस नंतर राजापुरात होणार गंगाआरती.

काशीसह बनारस ला होणार्या गंगाआरतीप्रमाणेच राजापुर येथे पवित्र गोदावरी नदिची आरती गांवकर्यांकडुन होणार असुन या आरतीचे परिसरासह तालुक्यात आकर्षण आहे.महाशिवरात्रीदिवशी हेमाडपंथी घाटावर ब्राम्हणवृंदाच्या मंत्रोच्चरासह गांवकर्यांच्या ऊपस्थितीत ही आरती होणृ असुन,आरतीद्वारे गोदावरीचे पुजन होऊन तिच्याप्रती आदर व आभार व्यक्त करण्याचा गांवकर्यांचा माणस आहे.या आरतीसाठी छत्रपती संभाजीनगरहुन वेदमुर्ती श्रीरामशास्त्री राजापुरकर व त्यांचे सहकारी आणि राजापुर येथील दिपक जोशी,शिवाजी बुडुख,शशिकांत जोशी,संतोष जोशी यासह गावातील ब्राम्हणवृंद ऊपस्थीत असतील.



# साधु शिवरामपुरी मठ संस्थान कायमच आमचे ऊर्जास्त्रोत – आ नमिता मुंदडा

## वरपगाव येथील एककोटी रुपयांच्या सभामंडपाचे लोकार्पण

केज (प्रतिनिधी)

वरपगाव येथील साधु शिवरामपुरी मठ संस्थान हे कायमच आमचे श्रद्धास्थान राहिलेले आहे येथुन मिळणारी ऊर्जा आम्हाला कायमच लोक कल्याणकारी कामे करण्यास सतत प्रेरणा देणारी राहिली असल्याचे उदगार आ. नमिता मुंदडा यांनी वै. महंत रामकृष्ण महाराज वरपगावकर यांच्या पुण्यस्मरणानिमित्त आयोजित कार्यक्रम व सभामंडपाच्या लोकार्पण कार्यक्रमात काढले. या बाबत सविस्तर वृत्त असे की, केज तालुक्यातील वरपगाव येथील साधु शिवरामपुरी मठसंस्थान येथील महंत वै. रामकृष्ण महाराज यांच्यावर श्रद्धा असणारे भाविक लाखों च्या संख्येने महाराष्ट्रात आहेत. याठिकाणी वर्षभर धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल असते या कार्यक्रमांना असंख्य लोकांची उपस्थिती असते पण हे धार्मिक कार्यक्रम होण्यासाठी याठिकाणी सभामंडपच

नसल्याने गैरसोय होत होती ही बाब आ. नमिता मुंदडा यांच्या लक्षात आल्याने त्यांनी यासाठी विशेष प्रयत्न करत प्रादेशिक पर्यटन विकास निधी अंतर्गत येथे भव्य सभामंडप होण्या साठी एक कोटींचा निधी मंजूर करून घेतला होता या कामाचे भूमिपूजन सहा महिन्यांपूर्वी होऊन वै. महंत रामकृष्णमहाराज यांच्या पुण्यस्मरणानिमित्त होणाऱ्या सप्ताहापर्यंत याचे काम पूर्ण करण्यांचा संकल्प त्यांनी बोलून दाखवला होता. त्यानुसार रामकृष्ण महाराजांच्या पुण्यस्मरणानिमित्त आयोजित काल्याच्या कीर्तनावेळी मठाचे महंत ह.भ.प. भगवान महाराज यांच्या हस्ते या भव्यदिव्य सभामंडपाचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी जेष्ठ नेते नंदकिशोरजी मुंदडा, राजेसाहेब देशमुख, सुनील गलांडे, ऋषिकेश आडसकर, नेताजी शिंदे, श्रद इंगळे, भगवान केदार, हनुमंत भोसले, धनंजय देशमुख, महादेव सूर्यवंशी, लिबराज फरके, सुरज घुले, सुरेश नांदे, शिवाजी पाटील, खदीर कुरेशी, संतोष जाधव व मठ संस्थानच्या विश्वस्ता सह हजारो भक्तांची उपस्थिती होती.

# मानवलोक समाजकार्य महाविधालयात दोन दिवसीय राष्ट्रीय परिषद

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगर विद्यार्थी विकास मंडळ व मानवलोक समाजकार्य महाविद्यालयाच्या वतीने पर्यावरणाचा मानवी जीवनावर होणारा परिणाम आव्हाने समस्या व उपाय या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय परिषद संपन्न झाली. दोन दिवशीय परिषदेचे उद्घाटन अंबाजोगाईचे वनपाल गोविंद कस्तुरे घाटनांदुरच्या वसुंधरा महाविद्यालयाचे भुगोल विभागप्रमुख डॉ. सखाराम वाघमारे, समाज विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.प्रकाश जाधव डॉ. नजीर शेख व डॉ. हनुमंत साळुंके यांच्या उपस्थितीत झाले. दोन दिवसांमध्ये एकूण तीन सत्रच्या माध्यमातून ही परिषद झाली

उद्घाटन प्रसंगी गोविंद कस्तुरे यांनी वाढत्या प्रदूषणामुळे व विषारी औषधामुळे पाण्यातील प्रजाती तसेच उभयचर प्राणी पाळीव प्राणी वन्यजीव प्राणी यांच्यासाठी जास्तीत जास्त झाडांची संख्या वाढून मराठवाड्यात व मराठवाड्याच्या बाहेर वनसंपदा मोठ्या प्रमाणात निर्माण करणे गरजेचे आहे असे त्यांनी सांगितले.

डॉ. सखाराम वाघमारे यांनी पर्यावरणीय ऱ्हासामुळे थेट आरोग्य धोके निर्माण होतात हवामान आणि पूर हे असंसर्गजन्य रोगामध्ये एक प्रमुख घटक निर्माण करतात आणि एकूण जल प्रदूषण भूमी प्रदूषण व वायू प्रदूषण यामुळे मानवाच्या आरोग्यावर वेगवेगळ्या पद्धतीने परिणाम होतो तसेच सध्या वाढत्या लोकसंख्या मुळे आणि वाढत्या शहरीकरणामुळे जंगलांचा ऱ्हास होत आहे असे त्यांनी सांगितले

मराठवाडा समन्वयक पाणी फाउंडेशनचे संतोष शिनगारे यांनीही मनोगत व्यक्त केले जागतिक पर्यावरणाचा व हवामान बदलाचा वेगवेगळ्या देशावर कशा पद्धतीने परिणाम होत आहे आणि सध्याच्या ग्लोबल वार्मिंग मुळे वातावरणामध्ये कसे चेंजेस होत आहेत आणि सद्यस्थितीमध्ये जी जगामध्ये परिस्थिती निर्माण झालेली आहे यांच्या कारणांची व परिणामांची दुष्काळ मुक्तीसाठी व शाश्वत शेतीसाठी केलेल्या कामाची माहिती विद्यार्थ्यांना सांगितली.

डॉ. प्रकाश जाधव यांनी अध्यक्षीय समारोपात जगभरातून एकूण मृत्यू पैकी २३ टक्के मृत्यू हे पर्यावरणीय कारणामुळे होतात असे सांगितले.प्रास्ताविकात नजी शेख यांनी राष्ट्रीय परिषद आयोजनाबाबतचा उद्देश आणि महत्व विशद केले.उपस्थितांचे आभार डॉ. हनुमंत साळुंखे यांनी मानले. यावेळी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.





# छत्रपतींचे १२ किल्ले जागतिक वारसास्थळे घोषित करण्यासाठी सादरीकरण करण्यात येणार, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**पुणे– येत्या काळात किल्ले शिवनेरीवर सर्व अतिक्रमणे काढून टाकण्यात येणार आहेत. तसेच पुढील काळात छत्रपती शिवाजी महाराज यांचे १२ किल्ले जागतिक वारसास्थळे घोषित करण्यासाठी सादरीकरण करण्यात येणार असल्याची माहिती आज राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी किल्ले शिवनेरीवर दिलीय. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९५ व्या जयंतीच्या निमित्ताने किल्ले शिवनेरीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या उपस्थितीत शिवजन्मोत्सव उत्साहात साजरा झालाय.**

महिलांनी शिवरायांची महती सांगणारा पाळणा गायिला : यावेळी आज सकाळी ८ वाजता किल्ले शिवनेरीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवजन्मस्थानी पारंपरिक वेशातील महिलांनी शिवरायांची महती सांगणारा पाळणा गायिला. राष्ट्रगीत आणि 'गर्जा महाराष्ट्र माझा' या राज्यगीताची धून पोलीस बँड पथकाने वाजवून पोलीस पथकाकडून बंदुकीच्या तीन फैरी झाडून छत्रपती शिवरायांना मानवंदना देण्यात आलीय. यावेळी झालेल्या कार्यक्रमात त्यांनी याबाबत माहिती दिलीय. येत्या ५ वर्षांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा ४०० वा शिवजन्मोत्सव साजरा करणार आहोत. किल्ले शिवनेरीवर आल्यानंतर येथील मातीतून स्वराज्याची स्फूर्ती, तेज मिळते. यातून प्रेरणा घेऊन राज्याची सेवा करण्याकरीता आम्ही येथे येतो. राज्यशासनामार्फत शिवनेरी परिसरातील विकासकामे पूर्ण करण्यासाठी आम्ही कार्यरत राहू, असेही देवेंद्र फडणवीस म्हणालेत.

# अंजली दमानिया यांचे पुन्हा अर्धवट ज्ञान आणि खोट्या आरोपांचे प्रदर्शन

## अंजलीताई शासनाचा जी आर काढण्याची प्रक्रिया आधी समजून घ्या

धनंजय मुंडे यांच्याकडून अंजली दमानिया यांच्या आरोपांचे खंडन

मुंबई (प्रतिनिधी)

अंजली दमानिया यांनी आज पुन्हा एकदा अर्धवट ज्ञानाच्या आधारे खोटे बोलून जीआर काढला वगैरे म्हणून जे आरोप केले आहेत ते संपूर्णपणे चुकीचे असून त्या आपल्या अर्धवट ज्ञानाच्या आधारे खोटे आरोप करत असल्याचा खुलासा धनंजय मुंडे यांनी केला आहे. शासनाच्या कार्य नियमावलीनुसार ( रुल्स ऑफ बिजनेस ) जीआर अर्थात शासन निर्णय निर्गमित करण्यासाठीची एक पद्धत आहे, त्यासाठी प्रक्रिया आखून देण्यात आलेली आहे .

विभागातील कक्ष अधिकाऱ्याने त्या प्रकरणाची फाईल सादर केल्यानंतर ती उपसचिव, विभागाचे सचिव, अतिरिक्त मुख्य सचिव यांचे मार्फत मंत्र्यांच्या समोर मान्यतेस्तव येत असते, मंत्र्यांची मान्यता होण्यापूर्वी व झाल्या नंतर सुद्धा अतिरिक्त मुख्य सचिव दर्जाचे आय ए एस अधिकारी स्वतः ती फाईल तपासतात आणि त्या नंतरच तो शासन निर्णय निर्गमित होत असतो. त्यामुळे खोटे बोलून जीआर काढला वगैरे असे म्हणणे म्हणजे निव्वळ हास्यास्पद, मीडिया ट्रायल करणे आणि आपल्या अर्धवट बुद्धीचे प्रदर्शन करणे असे



आहे.

अंजली दमानिया यांनी गेल्या पंधरा वर्षात ज्या काही मीडिया ट्रायल रन केल्या, ज्या कोणाविरुद्ध आरोप केले त्यातील एकही आरोप अद्याप कोणत्याही मा न्यायालयात अथवा इतरत्र कोठेही सिद्ध होऊ शकलेला नाही. त्याचेही कारण अर्धवट माहिती हाच असावा.मंत्रिमंडळाचा निर्णय झाला किंवा नाही असे भासवून निर्णय होत नाही, भासवून गोष्टी करण्यासाठी ती अंजली दमानिया यांची प्रेस कॉन्फरन्स आहे का, असा प्रश्नही धनंजय मुंडे यांनी उपस्थित केलाय!

एखाद्या विषयास मंत्रिमंडळाच्या बैठकीत चर्चेअंती मान्यता झाल्यानंतर मंत्रिमंडळाच्या बैठकीचे इतिवृत्त हे माननीय मुख्यमंत्री महोदयांनी मान्य केल्यानंतर राज्यातील सर्वोच्च आयएएस अधिकारी असलेल्या माननीय मुख्य सचिव यांच्या स्वाक्षरीने निर्गमित केले जातात. मात्र दमानिया यांनी या प्रक्रियेची माहिती घेतली असती तर असे निराधार आणि धादांत खोटे विधान कदापि केले नसते.ऑफिस ऑफ प्रॉफिट पासून ते काहीही तथ्य नसलेल्या घोटाळ्यांचे कोणते तरी अर्धवट कागद समोर दाखवून त्याला पुरावा म्हणणे आणि मिडिया ट्रायल रन करणे हे अंजली दमानिया यांचा व्यवसाय झालेला आहे, त्यासंदर्भात त्यांच्याकडे कॉंक्रीट कागदपत्रे असल्यास त्यांनी न्यायालयात जावे, आता न्यायालयामध्ये आम्ही देखील त्यांना योग्य तो धडा शिकवू, असेही धनंजय मुंडे म्हणालेत.

फर्टीलायझर कंट्रोल ऑर्डर हा केंद्र शासनाचा कायदा आहे, त्यानुसार विशिष्ट प्रमाणपत्र धारण केल्याशिवाय व खत निर्माता कंपनीने प्राधिकृत केल्याशिवाय कोणालाही खतांची विक्री करता येत नाही. यासंदर्भात खत्रऋऊज ने संबंधित कंपन्यांना २०२२ व २०२३ मध्ये सुद्धा नोटीस दिलेल्या आहेत. पण आपल्या सोयीचे तेवढे बोलायचे आणि अर्धवट ज्ञान प्रदर्शन करणे हे धोरण फक्त बदनामीसाठी आहे.सदर कंपन्या या आमची उत्पादित खते विकण्यास प्राधिकृत नाहीत, फर्टीलायझर कंट्रोल ऑर्डर मधील तरतुदींप्रमाणे ओ प्रमाणपत्र असल्याशिवाय अशी खते विकता येत नाहीत, अशा प्रकारची प्रेस रिलीज आमचे स्वीय सहाय्यक यांनी नव्हे तर स्वतः इफकोने याआधीच काढलेली आहे, तसेच ती आजही खत्रऋऊज चा संकेत स्थळावर उपलब्ध आहे. अंजली दमानिया यांना देखील ही बाब समजत असावी



# परळीत धनंजय मुंडे यांच्या संकल्पनेतून राष्ट्रवादी कॉँग्रेसच्या स्वराज्य सप्ताहाचे दिमाखदार उद्घाटन

परळी (प्रतिनिधी)

परळीत धनंजय मुंडे यांच्या संकल्पनेतून छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे आज शिवजयंती उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने पुढील सात दिवस आयोजित करण्यात येत असलेल्या स्वराज्य सप्ताहाचे उद्घाटन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष ड राजेश्वर आबा चव्हाण, युवकनेते अजय मुंडे यांसह मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. तत्पूर्वी मोठ्या उत्साहात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन सामूहिक अभिवादन करण्यात आले. यावेळी शिव घोषणांनी परिसर दणाणून गेला होता.

धनंजय मुंडे यांनी स्वतः त्यांच्या नाथ प्रतिष्ठान या सामाजिक संस्थेच्या माध्यमातून परळी शहरातील मुख्य चौकात छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा उभारलेला आहे. याठिकाणी नाथ प्रतिष्ठान च्या वतीने शिवकालीन प्रवेशद्वार, विद्युत रोषणाई, तसेच खास सेल्फी पॉईंट उभारण्यात आले आहेत. याठिकाणी शिवप्रेमी नागरिकांनी प्रचंड गर्दी केलेली पाहायला मिळाली. दरम्यान पुढील सात दिवसात स्वराज्य सप्ताह या उपक्रमात विविध सामाजिक उपक्रम राबविले जाणार असून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या पदाधिकारी व नागरिकांनी यात सहभागी व्हावे असे आवाहन तालुकाध्यक्ष वैजनाथराव सोळंके तसेच शहराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी यांनी केले आहे.

# रेखा गुप्ता दिल्लीच्या नव्या मुख्यमंत्री; आज शपथविधी

नवी दिल्ली : भाजपच्या आ. रेखा गुप्ता दिल्लीच्या नवीन मुख्यमंत्री असतील. रामलीला मैदानावर गुरुवारी दुपारी १२:०० वाजता त्यांचा शपथविधी होणार आहे. दिल्ली प्रदेश भाजप कार्यालयात केंद्रीय निरीक्षकांच्या उपस्थितीत बुधवारी त्यांची विधिमंडळ पक्ष नेतेपदी निवड करण्यात आली.

शालिमार बाग मतदारसंघातून प्रथमच आमदार झालेल्या रेखा गुप्ता यांचा जन्म हरयाणात झाला. त्या अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेशी संबंधित आहेत. सुषमा स्वराज, शीला दीक्षित व आतिशी यांच्यानंतर त्या दिल्लीच्या चौथ्या महिला मुख्यमंत्री



असतील. रामलीला मैदानावर गुरुवारी होणारा शपथविधी समारंभ भव्य-दिव्य करण्यासाठी जय्यत तयारी सुरू आहे. या समारंभाला पंतप्रधान नरेंद्र मोदी, त्यांचे मंत्रिमंडळातील सहकारी व एनडीएशासित राज्यांचे मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री उपस्थित राहणार आहेत.


# ज्ञानेश कुमार यांनी मुख्य निवडणूक आयुक्तपदाचा पदभार स्वीकारला

नवी दिल्ली (प्रतिनिधी)

यांनी बुधवारी २६ वे मुख्य निवडणूक आयुक्त म्हणून पदभार स्वीकारला. राष्ट्र उभारणीचे पहिले पाऊल म्हणजे मतदान आहे, असे यावेळी ते म्हणाले. तसेच डॉ. विवेक जोशी यांनी निवडणूक आयुक्त म्हणून पदभार स्वीकारला. पदभार स्वीकारल्यानंतर ज्ञानेश कुमार म्हणाले की, वयाची १८ वर्षे पूर्ण केलेल्या भारतातील प्रत्येक नागरिकाने मतदार बनले पाहिजे आणि नेहमी मतदान केले पाहिजे. भारताची राज्यघटना, निवडणूक कायदे, नियम आणि त्यामध्ये जारी केलेल्या सूचनांनुसार भारत निवडणूक आयोग मतदारांच्या पाठीशी होता, आहे आणि नेहमीच राहील, असे ते म्हणाले. ज्ञानेश कुमार यांनी १७फेब्रुवारी २०२५ रोजीच्या केंद्रीय कायदा आणि न्याय मंत्रालयाच्या राजपत्र अधिसूचनेनुसार भारताचे २६ वे मुख्य निवडणूक आयुक्त म्हणून पदभार स्वीकारला आहे, असे केंद्रीय निवडणूक आयोगाने म्हटले आहे.

दरम्यान, १७ फेब्रुवारी रोजी रात्री उशिरा राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू यांनी कुमार यांची मुख्य निवडणूक आयुक्त म्हणून आणि डॉ. विवेक जोशी यांच्या निवडणूक आयुक्त म्हणून निवडीला मंजुरी दिली होती. त्या अगोदर सायंकाळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या निवड समितीच्या बैठकीत त्यांची निवड करण्यात आली होती. या निवडीला लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी बैठकीत विरोध केला होता.

ज्ञानेश कुमार हे केरळ केडरचे माजी भारतीय प्रशासकीय सेवा (आयएएस)



अधिकारी आहेत. मुख्य निवडणूक आयुक्त म्हणून निवड होण्याअगोदर ते निवडणूक आयुक्त होते. त्याअगोदर ते गृहमंत्री अमित शहा यांच्या नेतृत्वाखालील सहकार मंत्रालयात सचिव होते. फेब्रुवारी २०२४ मध्ये ते सचिव पदावरुन निवृत्त झाले. तर डॉ. विवेक जोशी हे १९८९ च्या बॅचचे हरियाणा कॅडरचे आयएएस अधिकारी आहेत.

# सरकार आणखी एक मराठा आंदोलन उभे करणार : मनोज जरांगे

अंतरवाली सराटी (प्रतिनिधी)

मराठा आरक्षणाचे नेते मनोज जरांगे यांनी आणखी एक नवीन गौप्यस्फोट केला आहे. त्यांचे आंदोलन दडपण्यासाठी सरकार स्वतःचे आंदोलन उभे करणार आहे. सरकारचे दोन मंत्री त्या आंदोलनात सहभागी होणार आहे. याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



यांच्यासोबत दोन मंत्र्यांची चर्चा झाल्याची माहिती एक मंत्र्याने आपणास दिल्याचा दावा मनोज जरांगे यांनी केला आहे.

माध्यमांशी बोलताना मनोज जरांगे म्हणाले, सरकार आणखी एक मराठा आंदोलन उभे करणार आहे. त्या आंदोलनात दोन मंत्री असणार आहे. १२ ते १३ दिवस आमरण उपोषण करणार आहेत. त्यातील एक मंत्र्यांनी मला ही माहिती दिली. त्यानंतर १४ दिवसानंतर मुख्यमंत्र्यांसोबत बैठक लावणार आहे. मंत्र्यांना सोबत घेत सरकार नवे मराठा आरक्षण आंदोलन उभे करण्याच्या तयारीत आहे, असा गौप्यस्फोट मनोज जरांगे यांनी केला. मंगळवारपर्यंत देवेंद्र फडणवीस आरक्षणाचा मार्ग काढतील. हैद्राबाद, बॉम्बे आणि सातारा गॅझेट लागू करतील, असा विश्वास मनोज जरांगे यांनी व्यक्त केला.

# महादेव मुंडे खून प्रकरण

## एसआयटीतपासणार १५० जणांचे कॉल डिटेल्स

प्रतिनिधी । परळी

पिग्मी एजंट महादेव मुंडे यांच्या खून प्रकरणाला १५ महिने उलटूनहीआरोपी फरार आहेत. त्यामुळेमृताच्या पत्नी ज्ञानेश्वरी मुंडे यांनी उपोषणाचा इशारा दिल्यानंतरतपासाला वेग आला आहे.याप्रकरणी एसआयटी प्रमुख,पोलिस निरीक्षक संतोष साबळेपरळीत दाखल झाले आहेत. मागीलआठवड्यात साक्षीदारांची तपासणीझाली. आता दीडशे जणांचे कॉलडिटेल्स तपासले जाणार आहेत.

सुरुवातीला अंबाजोगाई येथीलपोलिस उपअधीक्षकांकडे



गुन्ह्याचातपास होता. मात्र आमदार सुरेश धसआणि अंजली दमानिया यांनीआवाज उठवल्यानंतर तपासस्थानिक गुन्हे शाखेकडे देण्यातआला. मागील आठवड्यात विशेषतपास पथकाची नियुक्ती झाली.संतोष साबळे यांच्या नेतृत्वाखालीलपथकाने साक्षीदारांची तपासणी सुरूकेली. महादेव मुंडे पिग्मी एजंट होते.तसेच भिशीही चालवत होते.व्यवहारापुरतेच ते परिचयातीललोकांशी संबंध ठेवायचे. राजकीयकिंवा इतर कोणत्याही व्यक्तीशीत्यांचा फारसा संपर्क नव्हता. तरीहीत्यांचा खून करण्यात आला. हा खूननेमका कोणत्या कारणाने झाला,याचा शोध घेण्यासाठी एसआयटीतपास करत आहे.

पथकात एक पोलिस निरीक्षक, चार कॉन्स्टेबल


पोलिस अधीक्षक नवनीत काँवत यांनी या प्रकरणाच्या तपासासाठी विशेषपथक स्थापन केले. पूर्वी स्थानिक गुन्हे शाखेत काम केलेले पोलिस निरीक्षकसंतोष साबळे आणि चार कॉन्स्टेबल या पथकात आहेत. ज्ञानेश्वरी मुंडेयांच्यासह कुटुंबियांनी पोलिस अधीक्षकांची भेट घेतल्यानंतर तपासाला गतीमिळाली आहे. पोलिसांनी आरोपींना अटक करावी,

# राष्ट्रवादीनेच एकनाथ शिंदेंना मुख्यमंत्री बनू दिलं नाही

## पवारांचा होता विरोध

मुंबई : भाजप सोबत आम्ही सरकार बनवलं असतं, त्यांनी शब्द पाळला असता तर एकनाथ शिंदेच मुख्यमंत्री झाले असते. दुसऱ्या कोणाचा प्रश्नच नव्हता. उद्धव ठाकरे याबाबतीत प्रमाणिक आहेत. त्यांनी शिंदेंची विधिमंडळ नेतेपदी निवड करून तसा सिग्नल दिला होता.पण भाजपने शब्द पाळला नाही. असे मोठं विधान ठाकरे गटातील खासदार संजय राऊत यांनी केला आहे.राष्ट्रवादी काँग्रेसनेच एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्री बनू दिलं नाही. असे म्हणत संजय राऊत यांनी शरद पवार यांच्यावर निशाणा साधला. महाविकास आघाडी तयार करून बनवलं पाहिजे ही एकनाथ शिंदे यांची भूमिका होती, त्यावर एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्री करू नका, असे शरद पवार यांनी सांगितलं होतं का ? असा प्रश्न राऊतांना करण्यात आला. त्यावर ते म्हणाले की, यात लपवण्यासारखं काय आहे ? भाजपबरोबर आम्ही सरकार बनवलं असतं, त्यांनी शब्द पाळला नाही.

महाविकास आघाडीत उद्धव ठाकरेंना मुख्यमंत्री बनवण्याच्या मुद्दावर देखील संजय राऊत यांनी भाष्य केले. त्या निर्णयात स्वत: एकनाथ शिंदे सहभागी होते. सामुदायिक निर्णय होता. त्यांनी कधी



विरोध केला नाही. त्यांना कुठलं खातं मिळतं. हे त्यांच्यासाठी महत्वाचं नव्हतं. महाविकास आघाडीच्या नेत्यांनी सांगितलं.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT